# Punyanagari

## Banking Industry

**Date: 23/08/2015 | Edition: Pune | Page: 6 | Source: Bureau | Clip size (cm): W: 13 H: 24**

**Clip: 1 of 1**




रिझर्व्ह बँकेने ११ नव्या संस्थांना पेमेंट बँकिंगचे परवाने देण्याचा निर्णय बुधवारी जाहीर केला. नव्या बँकांना पूर्ण बँकिंग करता येणार नाही, तरी सेवेच्या जोरावर या बँका अन्य बँकांपुढे आव्हान निर्माण करण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**। कैलास ढोले, अर्थतज्ज्ञ**




# बँकिंग क्षेत्रातील क्रांती

**गेल्या** दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बँकिंग परवान्याबाबत रिझर्व्ह बँकेने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. बुधवारी ११ संस्थांना पेमेंट बँक परवाने देण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्याबाबत उलटसुलट चर्चा झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी दिलेल्या परवान्यात टपाल खाते या एकमेव सरकारी उपक्रमाचा समावेश आहे. या सर्व बँका पेमेंट बँका आहेत. त्यांचे कामकाज १९४९ च्या रिझर्व्ह बँकेच्या कायद्यानुसार चालणार आहे. या बँकांना सध्याच्या बँकांप्रमाणे सर्व कारभार करता येणार नाही. मर्यादित बँकिंगचा परवाना त्यांना मिळाला आहे. १८ महिन्यांच्या आत त्यांना सर्व निकषांची पूर्तता करावी लागणार आहे. या बँकांना ठरावीक बँकिंग सेवाच देता येणार आहेत. ठेवी स्वीकारणे, पैसे काढणे, पैसे अन्यत्र पाठविता येणे, इंटरनेट बँकिंग, अन्य बँकाची 'बिझनेस करस्पॉडिंग' बँक म्हणून काम करणे आदी सेवा या बँकांना देता येणार आहेत. एक लाख रुपयांपर्यंतच्या ठेवीच या बँकांना स्वीकारता येणार असल्याने काळ्या बाजारातील फार पैसाही या बँकांत ठेवीच्या रूपाने येऊ शकणार नाही. अर्थात या बँकांना नॉन बँकिंग व्यवसाय भरपूर करण्याची संधी असल्यामुळे खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांशी त्या स्पर्धा करू शकतील. त्यातील काही संस्था सध्याच विमा, म्युच्युअल फंड क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना आता त्यांचा व्यवसाय या बँकिंगच्या माध्यमातून करण्याची संधी आहे. टपाल खात्याचे देशभर जाळे आहे. भारतात ग्रामीण भागात अजून बँकिंग सेवा पोचलेली नाही. टपाल खात्याला बँकिंगचा परवाना मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील अधिक नागरिकांना बँकिंगच्या प्रवाहात आणणे सहजशक्य आहे. यापूर्वीही टपाल खाते एमआयएस, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, आवर्ती जमा आदी माध्यमातून बँकिंग सेवा देतच होते. टपाल खाते मनिऑर्डरद्वारे पैसे पाठविण्याचे काम करीत होते. आता या खात्याला बँकिंग परवाना मिळाल्यामुळे ऑनलाईन पैसे पाठविण्याची सुविधा देता येईल. त्यामुळे शहरातील नागरिकांना ग्रामीण भागात पैसे पाठविण्यासाठी चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. रिझर्व्ह बँकेने परवाना दिलेल्या ११ संस्था एटीएम कार्ड, डेबिट कार्ड देऊ शकतील; परंतु त्यांना क्रेडिट कार्ड देण्याची परवानगी रिझर्व्ह बँकेने दिलेली नाही.

आदित्य बिर्ला न्यूओ लिमिटेड, एअरटेल एम कॉमर्स सर्व्हिस लिमिटेड, चोलमंडलम डिस्ट्रिब्युशन सर्व्हिर्सेस लिमिटेड, टपाल खाते, फिनो पे टेक लिमिटेड, नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेड, रिलायन्स इंडस्ट्रिज, दिलीप शांतिलाल संघवी, विजय शेखर शर्मा, टेक महिंद्रा लिमिटेड या ११ संस्थांना रिझर्व्ह बँकेनं बँकिंग परवाने दिले आहेत. बँकिंग परवान्यांसाठी ४४ संस्थांचे अर्ज आले होते. त्यातील ३३ नामंजूर झाले असले, तरी त्यांनाही अटींची पूर्तता करून पुन्हा बँकिंग परवान्यासाठी अर्ज दाखल करता येणार आहेत. रिझर्व्ह बँकेने या संस्थांना कागदपत्रांची आणि अन्य अटींची पूर्तता करण्याची संधी दिली आहे. आता परवाने दिलेल्या संस्थांनी रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या अटींची पूर्तता करून तातडीने बँकिंग व्यवसाय सुरू करणे अपेक्षित आहे. १८ महिन्यांची डेडलाईन त्यांना ठरवून देण्यात आली आहे. भारतात बँकिंग प्रवाहापासून दूर असलेल्यांची संख्या अजूनही भरपूर आहे. त्यांच्यापर्यंत बँकिंग अजून पोचलेले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनधन योजना सुरू केली. जगात एकाच वेळी सर्वप्रथम साडेसतरा कोटी खाती उघडली गेली. असे असले, तरी अजूनही बँकिंगचा विस्तार आणि आर्थिक साक्षरता करण्यास अजूनही भरपूर संधी आहे. त्याचा फायदा या संस्थांना मिळू शकेल. या बँकांच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेच्या खालील नागरिकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणता आले, तर त्यासारखे दुसरे काम होणार नाही. अर्थमंत्री अरुण जेटली यांनी रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचे कौतुक करताना हीच अपेक्षा व्यक्त केली आहे. भारतीय स्टेट बँकेसारखी बँक आता ग्रामीण भागात सेवेचे जाळे विस्तारत असताना पेमेंट बँकांनाही या बँकेला पूरक भूमिका निभावता येऊ शकेल. ॲक्सिस, एचडीएफसी, स्टेट बँक, आयसीआयसीआय बँकेसारख्या बँकांना या बँकांची भीती बाळगण्याचे कारण नाही. सध्याच्या प्रचलित बँकांचा व्यवसाय मर्यादित नाही. त्यांचे कार्यक्षेत्रही मर्यादित आहे. सध्याच्या प्रचलित बँकांना पेमेंट बँकांना आपल्या बिझनेस करस्पॉडिंग बँका होण्याची संधी देऊ शकतील. सध्याच यापैकी काही संस्थांचे प्रचलित बँकांशी टायअप आहे. रिलायन्स इंडस्ट्रिडच्या प्रस्तावित बँकेत स्टेट बँक तीस टक्के हिस्सा घेऊ शकते. भारती एअरटेलने कोटक महिंद्र बँकेचा १९.९ टक्के हिस्सा घेण्याची तयारी दाखवली आहे. आदित्य बिर्ला न्यू लिमिटेडने आयडिया सेल्यूरल कंपनीला ४९ टक्के भागीदारी देण्याचा करार केला आहे. सन फॉर्मा ही कंपनी आता जगातील मोठया कंपन्यांत गणली जाऊ लागली आहे. तिचे मालक दिलीप सांघवी यांनी आता औषध उद्योगाबरोबरच बँकिंग क्षेत्रातही प्रवेश केला आहे. या बँका सध्याच्या प्रचलित बँकांशी स्पर्धा करण्याची शक्यता डॉ. राजन यांनी फेटाळून लावली. या बँका तसंच प्रचलित बँकांची सेवा परस्परांना पूरक राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पेमेंट बँकांची घोषण करून रिझर्व्ह बँक थांबलेली नाही. पुढच्या महिन्यात लघुवित्त बँकेची घोषणा करण्याचे सूतोवाच डॉ. राजन यांनी केले आहे. लघुवित्त बँकांसाठी रिझर्व्ह बँकेकडे ७२ प्रस्ताव आले आहेत. लघुवित्त बँकांसाठी अर्ज करणाऱ्यांत डीएचएफएल, आयआयएफएल होल्डिंग्ज, लुलू फॉरेक्स, एसकेएस मायक्रो फायनान्स, यूएई एक्स्चेंज आणि उज्जीवन फायनान्सिअलचा समावेश आहे. पेमेंट बँकांपेक्षा लघुवित्त बँकांना मात्र जास्त सेवा देता येतील. मूळ बँकिंगच्या सर्व सेवा लघुवित्त बँका देऊ शकतील. लघुउद्योग, छोटे शेतकरी तसंच अन्य घटकांना या बँका कर्जही देऊ शकतील. पेमेंट बँका, त्यापाठोपाठ लघुवित्त बँकांमुळे भारताचा बँकिंग व्यवस्थेचा पूर्ण आराखडाच बदलला जाणार आहे. सध्या एटीएम, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्डचा जमाना असला, तरी प्रचलित बँकांमध्ये अजूनही बँकिंग व्यवहारासाठी प्रचंड गर्दी असते. स्टेट बँकेसह अन्य बँकांत गर्दीचा सामना करावा लागतो. शाखाविस्तार होऊनही बँकिंग व्यवस्था अजून सर्वांना गतिमान सेवा देऊ शकत नाही. एकीकडे ही स्थिती असताना आता मात्र पेमेंट बँका तसंच लघुवित्त बँका मात्र आता गावोगाव, गल्ली-गल्लीत सुरू होण्याची शक्यता असून त्यामुळे ग्राहकांना आता त्यासाठी रांगा लावण्याची आवश्यकता भासणार नाही. गेल्या वर्षापासून कॅशलेस अर्थव्यवस्थेवर जोर दिला जात आहे. काळ्या पैशाचे स्तोम कमी करणे, मोठ्या खरेदी रोखीत न करणे आदी बंधने सरकारने घातली आहेत. डेबिट कार्डासह अन्य कार्डांच्या वापरासाठी कॅशबॅक ऑफर दिल्या जात आहेत. त्यासाठी सेवांचा विस्तार वाढविण्याचे रिझर्व्ह बँकेचे धोरण आहे. वीस मिनिटांच्या अंतरावर बँकिंग सेवा पोचली पाहिजे, असे लक्षात घेऊन परवाने देण्यात आले आहेत. डॉ. राजन आणि अन्य लोक पेमेंट बँकांमुळे सध्याच्या प्रचलित बँकांना स्पर्धा करावी लागणार नाही, असे म्हणत असले, तरी प्रत्यक्षात पेमेंट बँकांकडे असलेले अत्याधुनिक तंत्रश्वान पाहता त्यांच्या वेगाशी सध्याच्या बँका स्पर्धा करणे अवघड आहे. त्यामुळे प्रचलित बँकांनाही बदलाव लागेल. ज्या बँका बदलणार नाहीत, ग्राहक निगडित सेवा सुधारणार नाहीत, त्यांचा टिकाव लागणे अवघड आहे.